# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
## दिनांक १३/०२/२०२२ (रविवार)

---

### खुनाचा प्रयत्न करणा—या आरोपीवर गुन्हा दाखल

**पोलीस स्टेशन सावनेर :—** अंतर्गत वार्ड क्र १७ पहलेपार सावनेर ०२ किमी पश्चिम यातील. फिर्यादी नामे शिवा श्रावन ढोले वय २० वर्ष रा. वार्ड क्र. १७ पहीलेपार सावनेर, जि नागपूर हा दिनांक ११/०२/२२ चे २१/०० वा. ते २१/३० वा. दरम्यान आपले मित्राचे घरासमोर पेटवलेल्या शेकोटीजवळ गेला असता आरोपी नामे— योगेश संपत गिरी उर्फे आयवा रा. वार्ड क्र १७ पहलेपार सावनेर याने फिर्यादीला 'तुने व तुझ्या मित्रांनी माझे एका मुलीसोबत अनैतीक संबंध असल्याबाबत बदनामी केली' असा संशय घेवून शिवीगाळ करून फिर्यादीला जिवे मारण्याचे उददेशाने गळ्यावर चाकुने घाव मारुन जख्मी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोस्टे सावनेर येथे नमुद आरोपीविरूध्द कलम ३०७,५०४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री कारंडे पो.स्टे. सावनेर मो. नं. ७७२२०११२२८ हे करीत आहेत.

### केबल वायर चोरी

**पोलीस स्टेशन रामटेक :—** अंतर्गत मौजा वाहीटोला के.एल.पीट एरिया ०४ किमी पश्चिम. यातील अज्ञात आरोपीने वाटर पंप हाऊसचे विद्युत सप्लाय करीता लावलेले ८० मिटर कॉपर केबल वायर कि. १,१०,९६०/—रूपयाचे दिनांक १०/०२/२०२२ ते ११/०२/२०२२ चे मध्यरात्री दरम्यान कापुन चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे प्रमोद क्रिष्णराव शेळके वय ५८ वर्ष रा.मनसर माईन यांचे रिपोर्टवरून अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास पोलीस हवालदार गजानन ऊकेबोंद्रे पो.स्टे रामटेक मो.न. ९८८१२४१०८९ हे करीत आहेत.

### मोटर सायकल चोरी

**पोलीस स्टेशन कन्हान :—** अंतर्गत कांद्री वाइन शॉप काद्री कन्हान यातील हर्ष ओमप्रकाश कश्यप वय १८ वर्ष रा. खद्दान न.३ मढीबाबा कन्हान याने त्यांची हिरो कंम्पणीची स्पलेंडर प्लस मोटर सायकल क्र एमएच ४० बिजी ५२०४ किं. ४५,०००/— रू ची वाईन शॉप कांद्री कन्हान येथे उभी करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने दिनांक ११/०२/२०२२ चे दुपारी १६/०० वा ते रात्री १२/०० वाजता दूपारी चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्टवरून पोस्टे कन्हान येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवि चा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक विलास काळे पोस्टे कन्हान करीत आहे .

## अपघातात मृत्यु

**१.पोलीस स्टेशन कोंढाळी :–** अंतर्गत मौजा नांदोरा शिवार एन एच ५३ निर्मल टेक्टाईल कंपनी ०५ किमी पश्चिम. दिनांक १२/०२/२०२२ चे १२/०० वा. ते १२/३० वा. यातील एक्सेन्ट कार क एम पी– २० सी एच–३०४१ ची चालक नामें सौ. अर्चना संदिप अग्रवाल वय ५७ वर्ष रा. ग्वालीयर मध्य प्रदेश ही एन.एच ५३ ने अमरावती कडून नागपूर कडे जात असता आपल्या ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळजिपणे चालविताना नमुद कार चे समोरील टायर फुटल्याने कारचे नियंत्रण सुटून डिव्हायडर वरून विरूदध दिशेने कार पल्टी झाली, ज्यात कारमध्ये बसलेले १) अनुपम विजय गुप्ता वय ५८ वर्ष २) रेणू अनुपम गुप्ता वय ५० वर्ष ३) अक्षत अनुपम गुप्ता वय २५ वर्ष तिन्ही रा जबलपुर यांचे मरणास व स्वत: जखमी होण्यास कारणीभूत ठरली.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे पोलीस हवालदार सुनिल बन्सोड पोलीस स्टेशन कोंढाळी यांचे रिपोर्टवरून चालक आरोपीविरूध्द कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भादवी सह कलम १८४ मोटार वाहन अधीनियम १९८८. अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक चंद्रकांत काळे पोस्टे कोंढाळी मोनं ८८८८८०३६५० करीत आहे.

**२.पोलीस स्टेशन केळवद :–** अंतर्गत मौजा खुर्सापार आर टी ओ १६ कि.मी. पश्चिम. दिनांक १२/०२/२०२२ चे १९/३० वा दरम्यान.यातील मोटार सायकल क्र एम पी २८ एम पी ५७९७ ने सुनिल पाटील हे आपल्या गाडीवर त्यांची पत्नी सुनिता व कुमारी पल्लवी यांना शिवनी वरुन केळवद येथे येत असतांना पांढुर्णा कडून येणारी कार क्र एम एच ४० बिएल ४१४९ चे चालक यांनी आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन मोटर सायकलला मागुन धडक मारली, त्यामुळे मोटार सायकल वर बसलेली सुनिता पाटील हिच्या डोक्याला जबर मार लागुन मरण पावली. व मोटर सायकल चालक व कुमारी पल्लवी यांना किरकोळ मार लागुन जखमी झाले आहे. .

सदर प्रकरणी फिर्यादी नामे राहुल सुनिल नारनवरे वय २० वर्ष रा दाडीमेठा त. पाढुर्णा जि छिंदवाडा यांचे रिपोर्टवरून आरोपीविरूध्द कलम २७९,३०४(अ) ३३७ भा.द.वि. सहकलम १८४ मोवाका अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक श्री आत्राम साहेब, मो न ९४०५१९४३१७ पोस्टे केळवद करीत आहे.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**